**शासकीय दूध योजनेमार्फत खरेदी - विक्री करण्यात येणाऱ्या दुधाचे दर तसेच संघ/ संस्था कमिशन व वितरक कमिशन इ. अनुषंगाने सुधारीत दर निश्चित करण्याबाबत**

## महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांकः एमएलके २०१३ /प्र.क्र. ९८/ पदुम ८

मंत्रालय विस्तार, मुंबई ४०००३२

तारीख: २१ नोव्हेंबर, २०१३

<u>वाचा</u>

१) शासन निर्णय क्रमांकः कृषि व पदुम विभाग,क्रमांक एमएलके १००५/१२८१/ प्र.क्र.१५/पदुम ८, दिनांक १३.६.२००६

२) शासन निर्णय क्रमांकः कृषि व पदुम विभाग, क्रमांक एमएलके २०१०/ प्र.क्र.२५५/पदुम ८, दिनांक २६.८.२०१०

३) शासन निर्णय क्रमांकः कृषि व पदुम विभाग, क्रमांक एमएलके २०११/प्र.क्र.१९/पदुम ८, दिनांक ४.२.२०११

४) शासन निर्णय क्रमांक : कृषि व पदुम विभाग, क्रमांक एमएलके २०१३/प्र.क्र.४५/पदुम ८, दिनांक २२.५.२०१३

<u>प्रस्तावना</u>

राज्यातील दूध संकलन शासन, सहकार व खाजगी क्षेत्रामार्फत होत असल्याने दूध खरेदी दरात बाजारातील चढ- उतार लक्षात घेवून काही दूध संघ व बहुतेक खाजगी प्रकल्प दूध खरेदी दरात बदल करुन त्यांच्याकडील दूध संकलन नियंत्रित करीत असतात. परिणामी शासनाकडे होणाऱ्या दूध पुरवठयावर परिणाम होऊन शासनाकडील दूध वितरण व उत्पादन यामध्ये नियोजन राखणे शक्य होत नाही. त्यासाठी ज्या प्रमाणात खुल्या बाजारात दूध खरेदीचे दर असतील त्याच्या आसपास शासनाचे दूध खरेदी दर असणे आवश्यक आहे. यास्तव राज्यातील दूध संकलनाची व दूध खरेदी दराची स्थिती पाहता शासनाकडे होणाऱ्या दूध संकलनात सातत्य व नियमितपणा रहावा यासाठी दूध खरेदी व विक्री दर व संघ / संस्था यांच्या कमिशन निर्धारित करुन निर्णय घेण्यासाठी मा.मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानुसार दि.१३.८.२००९ च्या शासन निर्णयान्वये मा.सचिव

(पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली प्रदत्त समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. राज्यातील सद्य:स्थितीतील दर खरेदी दर, उत्पादन खर्च इ. बाबींचा आढावा घेऊन नवीन दर निश्चित करण्याबाबत प्रदत्त समितीच्या दिनांक २१.११.२०१३ रोजी झालेल्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने दूध खरेदी, विक्री दर, संघ / संस्था वरकड खर्च तसेच वितरकांना देण्यात येणारे विक्री कमिशन इ. मध्ये वाढ करण्याबाबतचे प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होते.

## शासन निर्णय :

शासनामार्फत दिनांक २२.५.२०१३ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या गाय / म्हैस दुधाचे खरेदी- विक्री दर, संघ/संस्था कमिशन बाबतचे दर पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहेत.

१) राज्यातील दूध उत्पादकांकडून ३.५ फॅट व ८.५ एसएनएफ गुणप्रतीच्या **गाय दूध खरेदी** दरात प्रति लिटर रु.१.५० ने वाढ करण्यात येत असून त्यामुळे **दूध खरेदी दर रु.१८.५०/- वरुन रु.२०.००/- एवढा करण्यात येत आहे. तसेच ३.६ ते ५.० प्रति पॉईट वाढीव फॅट साठी २० पैसे ऐवजी ३० पैसे इतकी वाढ करण्यात येत आहे.**

२) राज्यातील दूध उत्पादकांकडून ६.० फॅट व ९.० एसएनएफ गुणप्रतीच्या **म्हैस दूध खरेदी** दरात प्रति लिटर रु.१.५० ने वाढ करण्यात येत असून ते **रु.२७.५०/- वरुन रु.२९.००/- एवढा करण्यात येत आहे. तसेच ६.१ ते ७.५ प्रति पॉईट वाढीव फॅट साठी ३० पैसे वाढ कायम ठेवण्यात येत आहे.**

३) राज्यातील संघ/सहकारी संस्था /बहुराज्यीय संघ/नोंदणीकृत प्रकल्प यांना देण्यात येणाऱ्या **वरकड खर्चामध्ये** प्रति लि.३५ पैसे इतकी वाढ करण्यात येत असून **रु.३.०० ऐवजी रु. ३.३५** इतके करण्यात येत आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | तपशिल | सध्याचे दर | सुधारीत दर |
|---|---|---|---|
| १. | अंतर्गत वाहतुक | १३० पैसे | १४० पैसे |
| २. | शितकरण आकार | ३५ पैसे | ३५ पैसे |
| ३. | व्यवस्थापन खर्च | ४५ पैसे | ५५ पैसे |
| ४. | कॅन खर्च | ०५ पैसे | ०५ पैसे |
| ५. | संस्था कमिशन | ८५ पैसे | १०० पैसे |
| | एकुण | ३०० पैसे | ३३५ पैसे |

४) शासकीय दूध योजनेमार्फत बृहन्मुंबई दूध योजना व ग्रामीण योजनांमार्फत विक्री करण्यात येणाऱ्या पिशवीबंद **गाय / टोण्ड दूध व म्हैस / फूल क्रिम दूध विक्री दरात प्रति लिटर रु.२.०० ने वाढ** करण्यात येत आहे. सुधारीत दराबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे –

| अ.क्र | नाव | दूधाचा प्रकार | गुणप्रत | सध्याचे विक्रीदर रु. | | सुधारीत विक्री दर रु | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ लि. | १/२ लि. | १ लि. | १/२ लि. |
| १ | बृ.मु.दू.यो. | गाय/टोण्ड दूध | ३.५/८.५ | ३१.०० | १५.५० | ३३.०० | १६.५० |
| | | फूल क्रिम/म्हैस | ६.०/९.० | ४०.०० | २०.०० | ४२.०० | २१.०० |
| २ | ग्रामीण योजना | गाय/टोण्ड दूध | ३.५/८.५ | ३०.०० | १५.०० | ३२.०० | १६.०० |
| | | फूल क्रिम/म्हैस | ६.०/९.० | ३९.०० | १९.५० | ४१.०० | २०.५० |

५) दिनांक ४.२.२०११ च्या शासन निर्णयान्वये शासकीय दूध योजनेमार्फत वितरीत करण्यात दुधासाठी दूध वितरकांना त्यांनी केलेल्या वितरणाअनुषंगाने टप्पानिहाय देण्यात येणाऱ्या प्रति लिटर दूध विक्री कमिशनमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| दूध विक्री परिमाण (लि.) | सध्या देण्यात येत असलेले विक्री कमिशन (प्रति लिटर) | | | सुधारीत विक्री कमिशन (प्रति लिटर) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वितरक कमिशन | वाहतूक कमिशन | एकूण विक्री कमिशन | वितरक कमिशन | वाहतूक खर्च | एकूण विक्री कमिशन |
| १ ते ५० | १.३ | ०.७० | २.०० | १.४० | ०.७५ | २.१५ |
| १ ते १०० | १.५५ | ०.७० | २.२५ | १.६५ | ०.७५ | २.४० |
| १ ते २०० | १.८ | ०.७० | २.५० | १.९ | ०.७५ | २.६५ |
| १ ते ३०० | २.०५ | ०.७० | २.७५ | २.१५ | ०.७५ | २.९० |
| १ ते ३०० च्या वर | २.३ | ०.७० | ३.०० | २.४ | ०.७५ | ३.१५ |

६) दिनांक १३.६.२००६ च्या शासन निर्णयानुसार ज्या जिल्हयामध्ये दूध संकलन प्रति दिन ५०००० लिटर पेक्षा कमी आहे त्या जिल्हयातील सहकारी दूध संघ / संस्थांना ५५ पैसे अतिरिक्त कमिशन देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये अंशतः बदल करुन ज्या जिल्हयाचे एकत्रित दूध संकलन प्रति दिन ५०००० लिटर पेक्षा कमी आहे अशा जिल्हयातील दूध संघांना व संस्थांना प्रोस्ताहित करण्याकरीता देण्यात येणारे ५५ पैसे अतिरिक्त कमिशन हे कायम ठेवण्यात येत आहे.

७) दि.२६ ऑगस्ट, २०१० च्या शासन निर्णयान्वये ज्या विभागात दूध संघ कार्यरत नाही, अथवा दूध संघ दूध संकलनाचे कार्य करीत नाही अशा ठिकाणी शासन दूध संकलनाचे कार्य करते. यासाठी या संकलन मार्गावर दूध संकलनाकरीता येणाऱ्या प्रति लिटर खर्चाची मर्यादा रु.२/- इतकी निश्चित करण्यात आली होती. अशा ठिकाणी शासकीय दूध संकलन मार्गावरील दूध संकलन खर्चाची मर्यादा प्रति लिटर रु.२.६० इतकी निश्चित करण्यात येत आहे.

हे आदेश दि.२५.११.२०१३ पासून अंमलात येतील.

हे आदेश प्रदत्त समितीच्या दिनांक २१.११.२०१३ च्या बैठकीत शिफारस केल्यानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३११२२११५२४०३००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sathe Shashank M

Digitally signed by Sathe Shashank M
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Agri & ADF, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sathe Shashank M
Date: 2013.11.22 14:35:01 +05'30'

(श.मा.साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

प्रति,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.(सर्व) मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक
प्रधान सचिव (वित्त ), मंत्रालय, मुंबई
सचिव (सहकार), मंत्रालय, मुंबई
आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या., गोरेगांव, मुंबई
महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना, वरळी, मुंबई ४००० १८

प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे/ नागपूर / मुंबई / औरंगाबाद /नाशिक / अमरावती
सर्व जिल्हा दुग्धविकास अधिकारी
सर्व महाव्यवस्थापक / व्यवस्थापक, शासकीय दूध योजना
महालेखापाल १ /२, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) मुंबई / नागपूर
अधिदान व लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग (व्यय २)
सर्व कार्यासने (पदुम विभाग)
निवडनस्ती.